रे. मु. क्र. ८/२०१९
(CNR No. MHAK07000074-2019)

**: निशाणी २७ वर आदेश :**

१. प्रतिवादी क्र.१ ने प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ६, नियम १७ प्रमाणे परिणामी दुरुस्तीकरीता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीचे असे कथन आहे की, वादीने प्रस्तुत दाव्यात दावा दुरुस्तीचा अर्ज केला होता. त्यानुसार वादीने दाव्यामध्ये दुरुस्ती केली असुन त्या अनुषंगाने लेखी जबाबामध्ये परिणामी दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सबब अर्ज मंजूर करण्यात यावा.

३. वादीने सदर अर्जास अर्जाच्या मागे म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केला व तो खारीज करण्यात यावा अशी विनंती केली.

४. प्रस्तुत दावा वादीने जाहीरनामा, वाटणी, खरेदीखत रदद करुन मिळण्यासाठी व ताब्यासाठी दाखल केला आहे. अभिलेखावरुन स्पष्ट होते की, प्रस्तुत दाव्यात वादीने दुरुस्ती केली आहे. त्या अनुषंगाने प्रतिवादींना त्याच्या लेखी जबाबात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदर नियोजित दुरुस्तीने दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नसून उलट दाव्यातील संपुर्ण वादाचे निराकरण होण्यास मदत होणार आहे. सबब प्रतिवादीचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. करिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**: आ दे श :**

१) प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणेत येत आहे.

२) प्रतिवादीने नियोजित दुरुस्ती करुन दुरुस्त जबाबाची प्रत दाखल करावी.

बाळापूर.
दिनांक : १०.१२.२०१९.

(चं. प्र. रघुवंशी)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बाळापूर